# लोकसभेच्या निकालात दडली नव्या राजकारणाची नांदी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा टप्पा राहिला आहे. तो १ जूनला पूर्ण होऊन ४ जूनला निकालाचा धुरळा उडणार असल्याने उमेदवारांची धाकधाकू वाढताना दिसत आहे. याचबरोबर आगामी काळात विधानसभेच्या निवडणुका होणार असल्याने त्याचेही प्रतिबिंब या निकालात दडले आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी अशी प्रामुख्याने लढत झाली असली तरी पुढील काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत या वेगवेगळ्या पक्षांशी केलेली युती आणि आघाड्या कायम ठेवूनच सत्तेचा सोपान गाठणार की, आणखी काय बदल होतील याची उत्सुकता आहे.

महाराष्ट्रात १९५२ पासून आतापर्यंत झालेल्या सर्व विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये असलेल्या आघाड्यांचा विचार करता, महाराष्ट्राचे राजकारण हे आघाड्यांचेच राहिले आहे. १९९९ मध्ये काँग्रेस - राष्ट्रवादी व शिवसेना भाजप या - तुल्यबळ आघाड्यामुळे त्याचे स्वरूप ठळकपणे दिसून आले असले, तरी त्यापूर्वीच्या निवडणुकांमध्येही अनेक पक्षांनी एकत्र येत एकपक्षीय वर्चस्व असलेल्या काँग्रेसच्या विरोधात आघाडी उघडली होती. त्याचे स्वरुप मर्यादित होते.

मात्र, आता आता पुन्हा युती नव्हे तर महायुती आणि आघाडीऐवजी महाविकास आघाड्या करुन प्रत्येक पक्ष अस्तित्वासाठी किंवा सत्तेचा सोपान जवळ करण्यासाठी धडपडताना दिसत आहे. २०१९ मध्ये भाजप वगळून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. शिवसेनेने भाजपशी फारकत घेत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर संधान साधले. हे कितीकाळ टिकेल याची खात्री नव्हती. मात्र, हा प्रयोग झाला. राज्यात काँग्रेस- राष्ट्रवादीकडून 'आघाडीचा धर्म' असा शब्दप्रयोग नियमित होतो, तर दुसरीकडे 'हिंदुत्वासाठी युती' असा दावा भाजप - शिवसेनेकडून (शिंदे गट) केला जातो. पण दोन पक्षांना निवडणुकीदरम्यान किंवा निवडणुकीनंतर एकत्र येण्याची गरज का भासते? दोन पक्ष कशाच्या आधारावर एकत्र येतात? याला विचारधारेचे अधिष्ठान असते, की फक्त सत्तेची जुळवाजुळव की मतविभाजन टाळण्यासाठी एकत्र आलेली खेळी असते हे जनतेलाही आता कळायला लागले आहे.



## बदलत्या राजकारणाची होईल का सवय?

सध्या लोकसभा निवडणुकीत युती – आघाडीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यासारखी स्थिती आहे. सत्तेची जुळवाजुळव करण्यात मतदारांच्या भावनांचा अनादर होत असला तरी यापुढेही विधानसभा निवडणुकीत राजकीय स्थिती अधिक गुंतागुंतीची झाली तरी जनतेला आश्चर्य वाटणार नाही. कारण राजकारणात कधीही काहीही घडू शकते हा आजवरचा इतिहास आहे. त्यामुळे जनतेलाही आता बदलत्या राजकारणाची सवय होईल निश्चित.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी टिकून होती. मतविभाजन नको म्हणून महायुतीत आणि महाविकास आघाडीतही एकत्र आलेले पक्ष जनतेला फारसे पटले नाही. मात्र सत्ता मिळविण्यासाठी किंवा एखाद्या मोठ्या पक्षाला आव्हान द्यायचे असेल तर युती, आघाड्यांचे राजकारण फायद्याचे ठरते असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

## युती, आघाड्यांच्यामधून गाठला जाणार सत्तेचा सोपान

---

# आम्ही दोघी 'जुळ्या बहिणी' अन् आमचं यशसुद्धा अगदी 'जुळं'च!

● करकंबच्या तेजश्री आणि तृप्ती टॉपर

● 'हम है राही सक्सेस के' चा प्रत्यय

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

'आम्ही दोघी जुळ्या बहिणी अन् आमचं दहावी परीक्षेमधील यशसुद्धा अगदी 'जुळं'च बरं का! पंढरपूरच्या ग्रामीण भागातील करकंबच्या तेजश्री आणि तृप्ती यांनी व्यक्त केलेल्या भावना. हे दोघींनी एकदी समान म्हणजे ९३ टक्के असं दैदिप्यमान यश संपादन करीत जणू आकाशला गवसणी घालत हम है राही सक्सेस के याची प्रचिती आणून दिली आहे.



जुळ्यांमधील सारखेपणाबद्दल अनेकांना कुतूहल असते. त्यावर अनेक चित्रपटही निघाले आहेत. मात्र करकंब (ता.पंढरपूर) येथील आदर्श प्रशालेच्या तेजश्री व तृप्ती नागणे या जुळ्या बहिणींनी समान ९३ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांच्या या जुळ्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आदर्श प्रशालेचा निकाल ९८.७८ टक्के लागला. प्रथम क्रमांक जुळ्या नागणे भगिनींनी घेतला. द्वितीय क्रमांक सुमित मराळ ९२.८० टक्के, तृतीय क्रमांक गायत्री जव्हेरी ९२ टक्के, चतुर्थ क्रमांक विभागून स्वप्निल गुळमे व मांजरे राजनंदिनी ९१.४०टक्के यांना मिळाला. गुण मिळविले, प्रशालेतील ३१ मुले विशेष योग्यता, ३१ प्रथम श्रेणी तर १९ द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी जि.प.सदस्य बाळासाहेब देशमुख, संस्थेचे अध्यक्ष रामदास शेटे, सचिव पांडुरंग व्यवहारे, प्राचार्या विजय उंडे तसेच संचालक मंडळ व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

---

# नियती हरली; प्रणिती जिंकली

## अडथळ्यांच्या शर्यतींना टक्कर देत बहाद्दरनींनं लावला झेंडा

● कष्टाची समई तेवत ठेवत लेकीनं पेटवली यशाची प्रज्योत

● शुभेच्छांच्या वर्षावात चिंब चिंब सावळेश्वर कन्या

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**तीन वर्षांपूर्वी वडिलांचे अपघाती निधन झालं, आजीदेखील एक वर्षांपूर्वी कायची देवाघरी गेली. प्रचंड दु:खाचा डोंगर प्रणितीवर कोसळला. पण ती खचली नाही की थांबली नाही. आलेल्या प्रत्येक अडचणींचा सामना करत, अडथळ्यांच्या शर्यतींना टक्कर देत बहाद्दर प्रणितींनं यशाचा अटकेपार झेंडा रोवला. जणू नियती हरली...अन् प्रणिती जिंकली...असं ते झालं.आईच्या छायेखाली अन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वीज नसताना दिव्याच्या उजेडात अभ्यास करुन तिने दहावी परीक्षेत शाळेत पहिला क्रमांक पटकाविला.**



ही यशोगाथा आहे सावळेश्वर (ता.मोहोळ) येथील प्रणिती नागनाथ गावडे हिची. तीन वर्षांपूर्वी तिच्या वडिलांचे अपघाती निधन झाले. आजीही एक वर्षांखाली देवाघरी गेली. घरात प्रोत्साहन देणारे कोणी नसताना न डगमगता प्रणितीने शिक्षणाचा ध्यास कायम ठेवला.

घरातील, शेतातील कामात वेळ काढून दिवस न रात्र कधी उजेडात, कधी झाडाच्या सावलीत, कधी वीज नसताना घरातील दिव्याच्या उजेडात अभ्यास करीत तिने आपल्या समता विद्यालय या शाळेत ९२.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या स्पृहणीय यशाबद्दल गावातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रणिती ही घरातील मोठी मुलगी. तिला लहान बहीण व लहान भाऊ यांचा सांभाळ करत,शेतातील कामात आईला मदत करावी लागत होती. एवढेच नव्हे तर गावाजवळच्या बाजारात जाऊन शेतातील भाजी विकावी लागत होती.

समता विद्यालयातील शिक्षकांनी दिलेल्या व उपलब्ध पुस्तकांचा अभ्यास करुन अत्यंत कठीण परिस्थितीत तिने प्रथम क्रमांक मिळवला आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत व माध्यमिक शिक्षण समता विद्यालयात सुरु आहे. ती हुशार व कष्टाळू आहे. बारावीनंतर इंजिनीअरिंग शिक्षण घेण्यसाचा तिचा मनोदय आहे.

### मुलांच्या शिक्षणासाठी आई उपसतेय कष्ट

आई आठवी पास असून दोन्ही मुली अन मुलगा शिकून मोठे होण्यासाठी कष्ट सोसायची आई लता यांची तयारी आहे. मुलीने शाळेत पहिला क्रमांक मिळवण्याचा फार आनंद झाला असल्याचे आई लता गावडे ह्यांनी सांगितले आहे.

### पोरीनं नाव काढलं; आईचं काळीज सुपा एवढं झालं

वडिल आणि आजी कायमचं सोडून गेल्याचं दु:ख मनात होतं. मात्र दु:खानं खचून न जाता प्रणितीनं अभ्यास केला. तिच्या या प्रामाणिक कष्टाला यशाचे चार चाँद लागले. ९२. ६० टक्के गुण मिळवून प्रणितीनं पहिल्या क्रमाकांनं उत्तीर्ण होण्यातून गावात, पै-पाहुणे, भावकी यामध्ये नाव काढलं. याचं आप्ररुप आई लता यांना आहे. पोरीनं जे यश मिळवलं त्यानं आईचं काळीज सुपा एवढं झालं.

---



# अगली मंझिल... हमे बनना है पुलिस!

## बारावी कक्षा की हुई ना बात

● हिणवणुकीला झिडकारुन तृतीय पंथीयाची बारावीत गगनभरारी

● दिवसभर ट्रॅफिक सिग्नलवर थांबून पैसे मागणे अन् रात्री अभ्यास

✔ सोलापूर : काहींवर नैसर्गिक दृष्ट्या ओढवलेल्या आपत्तीमुळे तृतीयपंथी म्हणून जीवन जगावे लागते. यावरुन त्यांची हेटाळणीही होते. मात्र सोलापुरातील एकाने त्याकडे दुर्लक्ष करुन बारावी परीक्षेत यश मिळविले आहे.

सोलापूर शहरातील हनुमान नगर येथे राहणाऱ्या रवींद्र उर्फ प्रीती नागटिळकने यंदा बारावी परीक्षेत यश मिळवले. बारावी ध्ये एक्कोणपन्नास टक्क्यांनी उत्तीर्ण होत पोलीस भरतीसाठी ती आता प्रयत्न करत आहे. त्यासाठी आयुष्यात खडतर प्रवास करत दहा वर्षांपूर्वी सुटलेला अभ्यास पुन्हा करायला प्रारंभ तिने केला. कडबगाव (अक्कलकोट स्टेशन) येथील सिध्दाराम म्हेत्रे ज्युनियर कॉलेजम ध्ये प्रा.सुर्यकांत कडबगांवकर व कोन्हाळीचे शिक्षक मल्लय्या हिरेमठ यांच्या सहकार्याने प्रवेश मिळवला.

प्राचार्य कंचनाळ व कडबगांवकर यांचे तिला मार्गदर्शन मिळाले. दिवसभर सिग्नलवर पैसे मागणे तर रात्री अभ्यास करुन तिने बारावी परीक्षेत यश मिळविले. सध्या स्वकष्टावर पोलीस भरतीचा सराव करत आहे. समाजाच्या पाठिंब्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र मार्फत सराव करण्याची तिची अपेक्षा आहे.

> समाजामध्ये ताठ मानेने जगण्याचा अधिकार आम्हालाही आहे. आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाने बदलण्याची व समाजामध्ये स्थान निर्माण करण्याची संधी देण्याची गरज आहे.
>
> **–प्रीती नागटिळक, हनुमान नगर, सोलापूर**

---

# स्वप्नाला फुटले दैदिप्यमान यशाचे पंख!

# आदित्य कामतकर : दहावीत 'सेंच्युरी'चा बल्लेबाज



✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**नाव आदित्य कामतकर. यश म्हणाल तर दहावीच्या परीक्षेत पैकीच्या पैकी म्हणजे १०० टक्के गुण मिळविण्याचं. आयुष्याच्या शैक्षणिक टप्प्यावरील दहावीच्या परीक्षेत स्पीचच्या पुढे जाऊन सेंच्युरीच ठोकायची हे त्यांनं बघितलेलं स्वप्न अक्षरश: सत्यात उतरलं. त्यानं उत्तम बल्लेबाजी करीत सेंच्युरी ठोकली अन् त्याच्या स्वप्नाला दैदिप्यमान यशाचे पंख फुटले. 'आदित्य कामतकर : दहावी सेंच्युरीचा बल्लेबाज' यावर मोहर उमटली. त्याच्या गगनभरारी यशानं माता-पित्याच्या डोळ्यातलंही स्वप्न साकार झालं.**



दहावी मधील यशाचा आनंदोत्सव साजरा करताना पिताश्री अमित आणि मातोश्री अदिती कामतकर यांच्या समवेत आदित्य.



तबला वादनाचा छंद जोपासताना सेंच्युरी बहाद्दर आदित्य.

- कला अन् छंद जोपासत दहावीला मिळवले पैकीच्या पैकी गुण
- संशोधक होण्याचं डोळ्यातलं स्वप्न साकार करण्यासाठी आता आगेकुच
- माता-पित्यासह इंडियन मॉडेल स्कूलचं नावदेखील केलं उज्ज्वल
- ताण न घेता यशाची गरूडझेप घेण्याचा इतर विद्यार्थ्यांसमोर ठेवला आदर्श

दरम्यान, आदित्यच्या या उज्ज्वल यशाच्या टप्प्यावर दैनिक 'सुराज्य' नं आज त्याच्याशी संवाद साधला. या संवादामधून त्याच्या यशाचं गमक तर कळलंच कळलं. पण त्याच्या यशाचं गमक इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा तो संवाद झाला. त्याच्यासोबत मारलेल्या गप्पांचा संपादित अंश...खास सुराज्यच्या लाडक्या वाचकांसाठी.

आदित्य म्हणाला, दहावी आहे म्हणून अभ्यासाचे टेंशन घेतले नाही, जसा वेळ मिळत गेला तसा अभ्यास केला, याच सोबत क्रिकेट, फुटबॉल,गायन, नृत्य, तबलावादन आणि टेबल टेनिसचा कसून सराव केला. छंद जोपासत केलेल्या अभ्यासामुळे मुड एकमद फ्रेश रहायचा. अन् १० वीच्या परीक्षेत पैकिचं पैकि म्हणजे १०० पैकि १०० गुण मिळवले असाच काहीसा प्रकार घडला आहे. सोलापूरातील इंडियन मॉडेल स्कूलच्या आदित्य कामतकर यांने १० वीच्या निकालात तडाखेबाज शतक ठोकले.

आयुष्यातील पहिला आणि महत्त्वाचा टप्पा समजल्या जाणाऱ्या दहावी इयत्तेच्या परीक्षेत संचुरी ठोकलेल्या आदित्यने दैनिक 'सुराज्य'शी खास संवाद साधला. त्याच्या साधलेल्या संवादामधून त्यांच्या गगनभरारी यशाचे रहस्य तर उलगडेलच. पण फक्त अभ्यास अन् अभ्यास असे न करता वैयक्तिक छंद जोपासूनसुद्धा परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवू शकतो, हा एक आदर्श त्याच्याकडून परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मिळाला.

दहावीबद्दल त्यांने सांगितले, मी १० वीत आल्यापासून अभ्यास सुरू केला आणि त्यात सातत्य ठेवले. माझी आई आणि वडील माझा अभ्यास घेत होते, त्यामुळे माझ्या १० वीच्या अभ्यासाकडे त्यानींच लक्ष दिले, त्यामुळे माझ्या यशामध्ये इंडियन मॉडेल स्कूलसह आई वडीलांचा सिंहाचा मोठा वाटा आहे. मला गायन आणि तबला वाद्य खूप आवडतं, त्यामुळे दहावीत आलो म्हणून हे शिक्षण बंद केले नाही. आठवड्यातून एक तास गायन आणि तीन तास तबला वाद्य क्लास होता. मग उरलेला वेळ मी अभ्यासासाठी वापरला.

### ना खासगी क्लास, ना अभ्यासाचं टेंशन...सिर्फ छान मुडचं अटेन्शन

आदित्य कामतकर म्हणाला, माझ्या या यशामध्ये आई, वडील आणि शिक्षकांचा मोठा हातभार आहे, त्यांच्या सहकार्यामुळेच मला १०० टक्के गुण मिळाले. खासगी क्लास लावले नव्हते, रोज ठराविक तास अभ्यास केलाच पाहिजे असे नव्हते, पण वेळ मिळत गेला की घरच्या घरी अभ्यास केला, आलेल्या अडचणी शिक्षकांना लगेच विचारून घेत, त्यामुळे संकल्पना स्पष्ट होत. हा अभ्यास करताना तबल्याचा क्लासलाही मी जात असे. दहावी नंतर आता विज्ञान शाखेत प्रवेश घेणार आहे, त्यानंतर जशा संधी उपलब्ध होतील ते ठरवेन.'

### आदित्यच्या डोळ्यातलं पुढचं स्वप्न म्हणजे संधोधक होणं

आदित्य हा उत्तम गायन करतो, तो विशारद आहे. तर कथक्क तबला शिकत असून आत्तापर्यंत चार परीक्षा दिलेल्या आहेत. सुराज्य'शी बोलताना आदित्य म्हणाला, दहावीमध्ये १०० टक्के मिळविणे हे माझे स्वप्न होते, हे स्वप्न पूर्ण केले. आता इंजिनिअर, संशोधक बनणे हे माझे स्वप्न आहे, ते मी पूर्ण करणार.